Pune Police

**प्रेस नोट**

ता. ०७/११/२०१७

## गुन्हे शाखा, युनिट २ कडून सराईत गुन्हेगारास गावठी पिस्टल सह अटक

पुणे शहर व शहरालगतच्या हद्दीतील गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करुन त्यांचेहातून कोणताही गुन्हा घडू नये म्हणून सदर रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर पाळत ठेवून त्यांना गुन्हा करण्यापासून परावृत्त करुन कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही तसेच फरारी आरोपींचा शोध घेण्याबाबत मा. प्रदिप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे , मा. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. समीर शेख सो, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांनी गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना सतर्क राहून रेकॉर्ड वरील गुन्हेगार यांचेवर पाळत ठेवून त्यांना वेळोवेळी चेक करुन गुन्हा करण्याचे तयारीत असताना तात्काळ जेरबंद करण्याबाबत आदेश दिले होते.

सदर आदेशाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी सतिश निकम यांनी त्यांचे युनिट मधील अधिकारी व कर्मचारी यांचेसह वाकड पो.स्टे हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना व फरारी गुन्हेगारांचा शोध घेत असताना युनिट २ मधील पोलीस हवालदार दिनेश गडांकुश यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शरीराविरुध्दचे गुन्हे करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार चंदन सुरेंद्र सिंग हा हॉटेल ब्रिज पॉईट समोर, औंध रावेत बी.आर.टी. रोडवर पुनावळे येथे फिरत असून तो कोणाचीतरी वाट पहात असून त्याने अंगात निळे व पांढऱ्या रंगाचा चौकटी शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली असून त्याचे कमरेस गावठी पिस्टल लावलेली आहे. अशी बातमी मिळाल्याने तात्काळ गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम यांचे मार्गदर्शनाखालील सहा.पोलीस निरीक्षक अन्सार शेख तसेच पोलीस कर्मचारी पोलीस हवालदार दिनेश गडांकुश, राजू केदारी, अनिरुध्द सावर्डे, प्रसाद जंगीलवाड यांनी सदर ठिकाणी जावून बातमीदारामार्फत खात्री करुन छापा टाकून बातमीतील इसमास ताब्यात घेतले. सदर इसमास नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव चंदन सुरेंद्र सिंग, वय २८ वर्षे, रा. सेक्टर नं. १७/१, दुर्गा कॉलनी, लेन नं. ३, गणेश नगर, थेरगाव, पुणे असे सांगितले. त्याची पंचासमक्ष अंग झडती घेतली असता त्याचे कब्जात एक गावठी बनावटीचे पिस्टल लोखंडी चॉकलेटी मुठ असलेले कि.रु. २५,०००/- व मॅगझीन मध्ये तीन जिवंत काडतुसे कि.रु. ७५०/- असे हत्यार एकूण किंमत रुपये २५,७५०/- मिळून आले. सदर बाबत वाकड पोलीस स्टेशन येथे आर्म ॲक्ट ३(२५) अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर एकूण ४ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी एक कराड जि. सातारा येथे भादवि क. ३०७ अन्वये तसेच बेकायदा शस्त्र बाळगले बाबत २०११ साली निगडी पो.स्टे. व २०१६ साली भोसरी पो.स्टे. येथे आर्म ॲक्ट ३(२५) अन्वये गुन्हे दाखल असून सदरचा आरोपी हा निगडी पोलीस स्टेशन गुरनं. ५७४/२०१७, भादवि क. १४३,१४७,१४८,१४९,३०७, आर्म ॲक्ट ३(२५),४(२५) या गुन्हयामध्ये फरारी आहे.

अशा प्रकारे गुन्हे शाखा युनिट २ मधील अधिकारी व कर्मचारी यांनी फरारी आरोपीस गावठी पिस्टलसह अटक केलेली आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे, सहा पोलीस आयुक्त, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम, सपोनि अन्सार शेख, पोलीस कर्मचारी दिनेश गडांकुश, चंद्रकां[illegible] महाजन, राजू केदारी, अनिरुध्द सावर्डे, प्रसाद जंगिलवाड यांनी केलेली आहे.

